पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३३०/२०२१
दिनांक : ०२/०७/२०२१

प्रति,


मा.......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **दि.०६/०७/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार**, दिनांक **०६/०७/२०२१** रोजी **दु.२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १४**

**दिनांक : ०६/०७/२०२१** **वेळ : दुपारी २.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **मंगळवार,** दिनांक **०६/०७/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

मा.शहर सुधारणा समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक १३) दि.१५/०६/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील मंजूर विकास योजनेतील महापालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झालेल्या क्षेत्रातील मौजे भोसरी येथील स.नं.२०९ व २१० पैकी मध्ये आरक्षण क्र.४०५ उद्यान व त्यालगत उत्तर दक्षिण १२ मी. रस्ता प्रस्तावित आहे. आरक्षण क्र.४०५ उद्यानाचे भूसंपादनानुसार १४३८२.७० चौ.मी. क्षेत्राचा ताबा दि.०७।१०।२००५ रोजी महापालिकेस भूसंपादनाने मिळालेला आहे. परंतु सदर १२ मी. रस्त्यामध्ये गरीब नागरिकांची घरे असल्याने मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांची घरे न पाडता सदर रस्ता स.नं.२१० पैकी मध्ये मनपाचे मोठ्या गटाराच्या पश्चिमेला लागून स्थलांतरीत करणेबाबत व सदर रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे क्षेत्र त्यांचेच मालकीचे स.नं. २११/१ पैकी मधून घेणेबाबत संबधित जागामालक यांनी दि.२४।०३।२००५ रोजी महापालिकेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अर्जदाराकडून स.नं.२११।१ चे ७।१२ नुसार त्यांचे मालकीची जागा दर्शविणारा मोजणी नकाशा घेऊन रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्राचा रितसर ताबा घेऊन तदनंतरच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेतील दक्षिणोत्तर १२ मी. रस्त्याची आखणी व आरक्षणाची स.नं.२११/१ मधील ताब्यात घेतलेल्या २२४४ चौ.मी. क्षेत्रासह होणारी सुधारित हद्द असा फेरबदलाची कार्यवाही करणेचे प्रस्तावास तत्कालीन मा.आयुक्त यांनी दि.२५।११।२००५ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने संबधित जागा मालक यांचेकडून ७/१२ उतारा, रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्राची मोजणी नकाशा, टायटल सर्च रिपोर्ट तसेच यु.एल.सी. बाबत र.रू.३००/- चे मुद्रांकावर शपथपत्र व बंधपत्र लिहून घेण्यात आलेले आहे. सदर ताब्यात

घ्यावयाच्या क्षेत्र बक्षिसपत्राने ताब्यात घेणेकामी बक्षिसपत्राचा मसुदा तसेच मालकीबाबत कायदा सल्लागार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दि.२२।०६।२००९ रोजी अभिप्राय घेवून अर्जदाराकडून शपथपत्र बंधपत्र लिहून घेऊन दि.१० सप्टेंबर २००९ रोजी रस्ता फेरबदल केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्र स.नं.२११/१ पैकी मधून बक्षिसपत्राने मनपाचे ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर दस्त दुय्यम निबंधक हवेली १७ - ०८७५२, दि.३०।०९।२००९ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. तसेच सदर ताब्यात घेतलेल्या २२४४ चौ.मी. क्षेत्रासाठी फेरफार क्र.२४७१४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेली असून तसा सुधारित ७/१२ उतारा व फेरफार दि.०३।१२।२०१० रोजीच्या पत्रान्वये कामगार तलाठी, भोसरी यांनी महापालिकेकडे पाठविलेला आहे. सबब, सदर ठिकाणी आजच्या जागेवरच्या परिस्थितीनुसार विकास योजनेत बदल करणे क्रमप्राप्त आहे. सदर फेरबदलानंतर उत्तर दक्षिण १२ मी रस्त्याची भूसंपादनाची पुढील कार्यवाही करणे शक्य होईल. प्रस्तुत प्रकरणी दक्षिणउत्तर १२ मी. रस्त्यामधील गरीब नागरिकांची घरे वाचविणेचे दृष्टीने मनपाचे मोठ्या गटाराला लागून पश्चिमेकडे १२ मी. रस्ता आखणी करणेकामी व रस्ता आखणी बदलल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे स.नं. २११/१ मधून मनपाच्या ताब्यात घेतलेल्या क्षेत्रानुसार आरक्षणाचे हद्दीमध्ये महाराष्ट्र व प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व फेरबदलाची कार्यवाही करणेस व फेरबदलाची सुचना प्रसिध्द झाल्यानंतर महापालिकेस प्राप्त होणा-या हरकती/सुचना अर्जांबाबत संबधितांना सुनावणी देणे तद् अनुषंगीक वैधानिक प्रक्रीया पुर्ण करून फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करणे यासाठी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांना प्राधिकृत करणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**( उल्हास बबनराव जगताप )**

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/३३०/२०२१

दिनांक : ०२/०७/२०२१ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.